

# भाकित न केलेल्या दंग्याची बखर

**कल्पना शर्मा**

9 जानेवारी, 1993 सकाळी मुंबईचे आकाश पावसाळी ढगांप्रमाणे झाकोळून गेले होते. कारण शहरामध्ये शेकडो ठिकाणी लागलेल्या आगी वातावरणात काळा धूर ओकत होत्या. शहराच्या समकालीन इतिहासातील ते चित्र म्हणजे एका काळ्याकुट्ट पर्वाचे ते रुपक आहे असे एखाद्याला वाटले असते. ज्या निखाऱ्याचे या आगी लावल्या तो अनेक दिवसापासून धुमसत होता. कदाचित ज्यांना सत्यस्थितीकडे कानाडोळा करणे सोईचे वाटत होते त्यांना ते दिसू शकत नव्हते. डिसेंबर 1992 व जानेवारी 1993 या दोन प्रकारच्या दंग्यांची, ज्यांनी या महानगराचे तुकडे तुकडे करून टाकले - उत्पत्ती पाहू गेल्यास ओळीने घडून गेलेल्या घटनाकडे निर्देश करता येईल. या घटना म्हणजे गेल्या तीन दशकापासून चालत आलेल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक घडामोडी होत. घटना घडून गेल्यावर ती समजून घेण्याचा फायदा घेतला तर कोणाच्याही हे आता लक्षात येईल की या ऐतिहासिक व सामाजिक कारणामुळे शहराची भूमी जातीय दंगलीसाठी सुपीक होत होती. पण 6 डिसेंबर, 1992 रोजी प्रथम, अयोध्येतील बाबरी मशीद शेकडो कारसेवकांनी पाडल्यावर काही तासातच दंगल भडकली, तेव्हा शहरातील अधिकारी व पोलीससुद्धा त्याचा मुकाबला करण्याच्या तयारीत नव्हते.

बाबरी मशीद पाडल्याबद्दल शहरातील मुस्लीमांची तीव्र प्रतिक्रिया पाहून अनेकजण आश्चर्यचकित झाले. या लोकांची अशी समजूत होती, बाबरी मशीद-अयोध्या वाद हा दूर उत्तरेकडील चमत्कार आहे व त्याचा इथल्या जीवनाशी काही संबंध नाही. ही संपूर्ण चुकीची समजूत होती. लोक धर्म व जात यांच्याशी इतक्या प्रमाणावर एकरूप झाले असतील याची त्यांना कल्पना नव्हती. राजकारणाचे जातीयीकरण मुंबईमध्ये 1980 पासूनच व्हायला लागले होते. आणि विशेषकरून शिवसेना ही निवडणुकीच्या राजकारणातील एक प्रभावी शक्ती म्हणून उदयाला येऊ लागल्यापासून या सर्वांपैकी कशाचाही लोकांच्या समजबुद्धीवर प्रभाव पडणार नाही असे मानणे हे अतिशय भाबडेपणाचे होईल.

## बदलणारी एकरुपता

मुंबईच्या समकालीन इतिहासात दंगे हे क्षेत्रविभाजक

समजले जातात. कारण एका दृष्टीने शहरातील विश्वबंधुत्वाच्या नाशास हे दंगे कारणीभूत झाले. हा शहराचा एक खात्रीलायक गुण होता, त्यातून सहिष्णूतेचे वातावरण परावर्तीत होत होते. सत्यस्थिती मात्र काहीशी वेगळी होती. जरी मुंबईचा काही भाग - विशेषत: मूळ बेटावरील शहराचा भाग बहुभाषिक लोकवस्ती असलेला असला तरी गेल्या दोन दशकात हे स्पष्ट झाले होते की उत्तरेकडे वाढत असलेल्या उपनगरांमध्ये ही बहुभाषिकता जाऊन वेगळेपणा वाढत होते.

या दंगलीतील सर्वात वाईट घटना या शहरातील नवीन विकसित भागात घडल्या - जुन्या शहरात नव्हे हे लक्षात, घेण्याजोगे आहे. शहराच्या जुन्या भागात (बेटांचे मिळून झालेल्या) अजूनसुद्धा मुस्लीमबहुल विभाग व हिंदूबहुल विभाग आहेत व कुलाबा, मलबारहीलसारख्या चांगल्या सुखवस्तू वस्त्यांत मिश्र जातीचे प्राबल्य आहे. तथापि उत्तरेकडील उपनगरात मात्र या जुन्या वस्त्यांमध्ये आढळणारी सहनशीलता जी या जमातीत एकमेकांशी चिकटून किंवा फारतर एखादी गल्ली पलिकडे राहिल्यामुळे होती ती अल्पांशानेही आढळत नाही. मुंबईची मुख्य वाढ उत्तरेकडे ठाणे ते थेट पनवेलपर्यंतच्या औद्योगिक पट्ट्यामध्ये होत होती. हे पुढचे शहरीकेंद्र होत होते. वाढीचे दुसरे क्षेत्र म्हणजे पश्चिम किनारपट्टीमध्ये उत्तरेकडे विस्तारणारे होते. या विभागात बिल्डर्स दलदलीमध्ये भराव टाकून त्यावर घरे बांधून त्यांचे रहिवाशी विभागांत रुपांतर करत होते. हा विभाग म्हणजे पश्चिमेकडेचे जंगलच होते. त्यावर आजपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अंमल चालत नव्हता. या बांधकामात कसलेही नियोजन नव्हते. अनेक इमारतींना बिल्डिंग खात्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र (नो ऑब्जेक्शन सर्टिफिकीट) मिळालेले नव्हते. त्यांना पाणी पुरवठ्याची अथवा सांडपाणी निचऱ्याची जोडणी मिळालेली नव्हती. तरीदेखील मुंबईतील तीव्र घरटंचाईमुळे हजारो कुटुंबांना या अर्धवट पूर्ण झालेल्या घरामध्ये आश्रय घेणे भाग पडले.

या नवीन उपनगरांमध्ये बहुसंख्य मध्यमवर्गीयांच्या सहकारी घरबांधणी संस्था स्थापन झाल्या व त्यांनी आपल्याच जातीच्या, किंवा एकाच प्रदेशातून आलेल्या (कदाचित एक दोन अपवाद असू शकतील) लोकांना सभासद करून घेतले. उदा. गर्दीच्या मध्य मुंबईतील डोंगरी, पायधुनी व नागपाडा येथे राहणाऱ्या मुस्लीमांनी त्यांची बचत मुंब्रा (उत्तर पूर्व उपनगर) येथील घरांमध्ये गुंतवली कारणं तिथे मुस्लीम बिल्डर्स त्यांच्या जातीतील कुटुंबांसाठी विशेष सवलतीच्या दराने घरे विकत होते. त्याचप्रकारे मध्य मुंबईतील हिंदू कुटुंबे घाटकोपर व भाईंदर येथे स्थलंतरित झाली.

या मध्यमवर्गीय घरांव्यतिरिक्त या उत्तरेकडील उपनगरात काही मोठ्या झोपडपट्ट्यांनी स्थलांतर केले कारण इथे वाढ होण्यासाठी मोठी रिकामी जमीन उपलब्ध होती. या नव्या झोपडवासी वस्त्यांमध्ये जसजसे मध्य मुंबईतून किंवा राज्याच्या व शहराच्या इतर भागातून बेघर झालेली कुटुंबे येऊन राहिली तसतसे शहरीजीवनातील ताण तीव्रतेने जाणवू लागले. एक समाज किंवा जमात बांधण्यास वेळच नव्हता. यापैकी बऱ्याच झोपडपट्ट्या नियमित केल्या गेल्या नव्हत्या. म्हणजेच सरकारला त्यांचे अस्तित्त्वच मान्य नव्हते व त्यामुळे त्यांना लागणाऱ्या मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी त्यांना वाटत नव्हती. अशा तऱ्हेने पाण्यासारखी मुलभूत सुविधा मिळवण्यासाठी झगडण्याचे पर्यवसान भीषण दंगलीत होत असे. पूर्वीच्या ठिकाणी पण असे झगडे होत असत जिथे काही किमान सुविधा उपलब्ध होत्या. परंतु इथले झगडे फार तीव्र स्वरुपाचे होते.

जुन्या झोपडपट्ट्यांमध्ये (मुंबईच्या जुन्या भागातील) एका प्रकारचे ऐक्य निर्माण झाले होते व त्यांना सरकार व स्थानिक राजकारण्यांशी कसे वागायचे याचा प्रदीर्घ अनुभव होता. (काही राजकीय पुढाऱ्यांचा पायाच जणू या झोपडपट्ट्यांत होता) पण नवीन झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्येत तो ऐक्यभाव नव्हता. स्थानिक गुंड किंवा दादाचे त्यांच्यावर नियंत्रण होते. ते कुठल्याही धटिंगणशाहीच्या मार्गांनी त्यांच्यासाठी या सुविधा मिळवून देत. असे लोक त्यांचा गुन्हेगारीशी उघड संबंध असूनही राजकीय पक्षांचे मर्जीत असत. अशा तऱ्हेने या झोपडपट्टीत गुन्हेगारी व

राजकारणी यांची एक खुली साखळी तयार झालेली स्पष्टपणे दिसून येते.

अशा तऱ्हेचे समाज झगडे होण्याच्या दृष्टीने आदर्श असतात. इथे संशयाची वाढ खुल्या युद्धापर्यंत होण्यास फारसा वेळ लागत नाही. तिथल्या एकूण रचनेच्या व जागेच्या दृष्टीकोनातून या जागा अशा कमी तीव्रतेच्या लढाईसाठी आदर्श ठरतात. कमी उंचीच्या, थोडेसे अंतर ठेऊन असलेल्या घरांच्या रांगा या तरुण मुलांसाठी उतरत्या छपरांवर चढून जाण्यासाठी आदर्श असतात. सुधारित संरक्षण (ढाल) घेऊन, त्यांच्या शत्रूचे लक्ष्य पकडून त्याना गावठी पेट्रोल बॉम्बने उध्वस्त करणे त्यांना शक्य होते. सामाजिक वादांसाठी हा उपाय जगभर वापरला जातो.

जातीय तणावांचे आणखी एक केंद्र म्हणजे (ट्रँझिट कॅम्प्स) ट्रँझिट कॅम्पस या महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डाने मुंबईच्या विविध भागात उभारलेल्या बरॅक्स पद्धतीच्या चाळी होत. यांचा उद्देश मध्य मुंबईतून किंवा जुन्या शहरांतून निरनिराळ्या कारणाने बेघर होणाऱ्या कुटुंबांना तात्पुरता निवारा उपलब्ध करून देणे हा होता. या कुटुंबाना त्यांचे घर सोडून इथे यावे लागले. कारण त्यांच्या घरांची दुरुस्ती चालू होती. परंतु या घरामध्ये तात्पुरत्या स्वरुपात रहायला आलेल्यांची मुदत वर्षानुवर्षे वाढत राहिली.

ज्या ट्रँझिट कॅम्पमध्ये त्यांना जागा दिली होती त्या एक खोलीच्या जागा असून संडास, बाथरूम वगैरे सोयी समाईक होत्या, पण स्वतंत्र पाण्याचे नळ असलेल्या होत्या. इथल्या कुटुंबांना त्यांच्या नजीकच्या शेजाऱ्यांची माहिती नव्हती. पण त्यांच्या पूर्वीच्या शेजाऱ्यांशी - जे सुद्धा नवीन ठिकाणी आलेले होते - हे सख्य करत होते. हे कॅम्प्स मिश्रजातींचे होते. तिथे हिंदू व मुस्लीम कुटुंबे शेजारी शेजारी राहत होती. दंगलीनंतर पुष्कळ लोकांना हे समजेना की लोकांना त्यांच्या शेजारच्या कुटुंबाचा विध्वंस होत असताना त्यांची ओळख कशी पटली नाही. विशेष म्हणजे ही कुंटुंबे अगदी शेजारी शेजारी एका दशकापेक्षा जास्त काळ रहात असताना याचे अचूक कारण हेच की हे सर्व आपल्या जुन्या जागी परत जायची वाट पहात होते व त्यामुळे अचानकपणे आलेल्या नवीन शेजाऱ्यांशी मैत्री वाढवण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही.

मुंबईतील झोपडपट्टीच्या लोकवस्तीची वाढ हा असंयुक्तिक व तिरकस जमीन धोरणाचा प्रत्यक्ष परिणाम म्हणावा लागेल. या धोरणाने केवळ अतिश्रीमंताचा फायदा झाला व त्यामुळे उत्तुंग इमारतीत राहणारे लोक व तात्पुरत्या निवाऱ्यामध्ये राहणारे लोक यांच्यात दुसरी फूट पडली. पदपथावर राहणाऱ्या लोकांसाठी तर ही फूट तीव्र स्वरुपाची होती. तशातच रस्त्यांवर राहणारे लोक भिन्न समाजातील असतील तर शत्रुत्वाची भावना कटुता वाढणारी ठरते.

**बदलती अर्थव्यवस्था**

मुंबईच्या भौगोलिक बदलाबरोबरच अजाणता शहराचे चित्रच बदलत होते. आर्थिक नकाशावरील बदलांचा पण चिरकाल टिकणारा प्रभाव होत होता. मुंबई ही एकवेळ पूर्वीचे मँचेस्टर म्हणून गणली जात होती. शेकडो कापड गिरण्यांच्या धुराड्यांनी आकाश व्यापलेले होते. पण 1970 पासून ही परिस्थिती बदलू लागली. शहरातील गिरणीच्या आधुनिकीकरणांत पैसा गुंतवण्याच्या गिरणी मालकांच्या अनिच्छेमुळे कापड उद्योगांचे आजारपण वाढीस लागले, व त्यामुळे शहराच्या आर्थिक चित्रात महत्त्वाचा बदल सुरू झाला. हळूहळू संघटित विभागाने आपली गुंतवणूक काढून घ्यायला सुरुवात केली व आपले उत्पादन अनौपचारिक व असंघटित क्षेत्रांकडे वळण्यास सुरुवात केली. उदा. कापड गिरण्यांनी आपले उत्पादन भिवंडी व सुरत येथील पॉवरलूम्सकडे सोपवले. इंजिनिअरिंग युनिट्सनी देखील आपले उत्पादन छोट्या युनिट्सकडे सोपवले. शहरांतील उत्पादन क्षेत्राची व्याप्ती कमी झाल्यामुळे शहरांतील ट्रेड युनियन्सच्या प्रभावावर पण परिणाम झाला. शहरांतील सर्वात प्रभावी ट्रेड युनियन ही कित्येक वर्षे कापडगिरणी कामगारांची होती. परंतु 1982च्या गिरणी कामगार संपाने शहरातील एकूणच कामगार संघटनांची मृत्यू घंटा वाजवली. 18 महिने एवढा दीर्घकाळ चाललेला संप -

जेव्हा गिरणीमालक बिलकुल वाकायला तयार होईनात व त्यांच्या गिरण्या बंद करायच्या तयारीला लागले, तेव्हा तो मोडून पडला. मध्यंतरीच्या काळात हजारो गिरणी कामगार कंगाल स्थितीत पोचले होते. अनेकांना इतर काहीही पर्याय न उरल्यामुळे शहर सोडून त्यांच्या गावी जाणे भाग पडले. अशा तऱ्हेने संपाने जीवन एका वेगळ्या वळणावर आणून सोडले.

1980च्या दशकात व 1990च्या दशकाच्या सुरुवातीस नवीन सर्व गुंतवणूक सेवा-क्षेत्रात झाली. शहरांतली उत्पादनक्षमता कमीत कमी होऊ लागली. उद्योग उत्तरेकडील व पूर्वेकडील भागात हलवले गेले. हे बदल व मुंबईच्या लोकांचे खालवत चाललेले राहणीमान, अंदाजे अर्धी लोकसंख्या झोपडपट्टीत राहणारी, या सर्वांमुळे एकेकाळी अत्यंत सुस्थिर व कार्यक्षम अशा महानगराचे रुपांतर सुरुंगाच्या दारूने भरलेल्या कोठारांत झाले होते व त्याचा स्फोट सांप्रदायिक दंग्यामध्ये कधीही होऊ शकत होता.

**बदलते राजकारण**

मुंबईवर परिणाम करणाऱ्या या बदलांच्या केंद्रस्थानी महाराष्ट्राचे विकसित होत असलेले राजकारण होते. मुंबईचा मूलभूत स्वभाव व राजकारण, त्याची गुजरातशी असलेला संबंध 1960 साली तोडला गेला, तेव्हापासून बदलायला सुरुवात झाली व आता शहर फक्त त्याचा एकमेव धनी - नव्याने अस्तित्त्वात आलेले महाराष्ट्र राज्य यांच्या तालावर नाचू लागले. तो वेळपर्यंत व 1970च्या दशकाच्या पूर्वार्धात ट्रेड युनियन्सची शहराच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावलेली होती. काँग्रेस पक्षाची संघटना द इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँगेस (आयएनटीओसी)चे कापडगिरणी विभागावर वर्चस्व होते व इतर कामगाराचे मोठे ग्रुप्स, उदा. रेल्वेज, ट्रान्सपोर्ट वर्कर्स, सफाई कामगार आदि संघटना बिगर काँग्रेस ट्रेड युनियनशी - विशेष करून समाजवादी व कम्युनिस्ट प्रभावित युनियन्सशी संलग्न होत्या.

या युनियन्सचा वाढता प्रभाव 1967 च्या निवडणुकीत स्पष्टपणे दिसून आला. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यापासून फक्त सात वर्षांत दोन ट्रेड युनियन्सच्या नेत्यांनी काँग्रेसच्या मोठ्या नेत्यांना निवडणुकीत खडे चारले. संयुक्त सोशॅलिस्ट पार्टीचे जॉर्ज फर्नांडीस यांनी मुंबई प्रदेश काँग्रेसचे कमिटीचे मुख्य महाप्रभावी स. का. पाटील यांचा पराभव केला व त्यामुळे त्यांना प्रचंड माणसाला चित्पट करणारा जॉर्ज असे टोपण नाव प्राप्त झाले. त्याचप्रमाणे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाच्या एस. ए. डांगे यांनी उद्योगपती हरीश महिंद्रा यांचा पराभव केला.

परंतु युनियन्सची वाढ व त्यांची ताकत या अप्रत्यक्षपणे शिवसेनेच्या उत्कर्षास जबाबदार आहेत, जिचा जन्म 1966 मध्ये झाला. दोन प्रभावी काँग्रेस नेत्यांच्या एक वर्षात झालेल्या पराभवामुळे काँग्रेसला या डाव्या युनियन्सला थोपवून धरण्यासाठी शिवसेना हा तर्कसंगत पर्याय वाटला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी जाणून बुजून हे जे नवीन राजकीय ग्रुपिंग होत होते, त्याला प्रोत्साहन दिले. जरी महाराष्ट्र हा महाराष्ट्रीयाचाच अशी त्यांची संकुचित धारणा होती तरीसुद्धा डाव्या युनियन्सचा कामगार वर्गावर असलेला गळफास तोडून टाकायचा त्यांचा उद्देश होता. राज्याच्या हितकारक संरक्षणाखाली बाळ ठाकरे यांच्या नवजात अनुभवी राजकीय ग्रुपचे सामर्थ्य वाढू लागले.

तथापि खूप नंतरपर्यंत याचा शहराच्या राजकारणावर फारसा प्रभाव जाणवला नाही. 1967च्या निवडणुकीनंतर काँग्रेस विरोधी भावना वाढीस लागली व 1977च्या निवडणुकीत तिचे पर्यवसन मुंबईतील लोकसभेच्या सर्व सहा जागा काँग्रेसला गमावाव्या लागण्यात झाले, याचे कारण सर्व देशांत जी आणीबाणी विरोधी लाट पसरली होती ते होय. 1980 च्या निवडणुकीतही त्याचा परिणाम दिसला नाही. तथापि 1984 च्या निवडणुकीत इंदिरा गांधीच्या हत्येनंतर मर्यादित यश मिळाले.

काँग्रेस पक्षाची मुंबईतील उतरती कळा मुंबई प्रदेश काँग्रेसचा प्रभाव कमी होण्याशी संबंधित आहे. यापूर्वी मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचा राज्यातील राजकारणावर मोठा प्रभाव

होता. कारण स्वातंत्र्यसंग्रामात तिने बजावलेले ऐतिहासिक कार्य. स. का. पाटील यांच्या पराभावाबरोबरच पक्षातील बड्या धेंडांचे वर्चस्व संपते. 1969मध्ये काँग्रेसपक्षात पडलेली फूट यामुळे मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचा राज्याच्या राजकारणावर असलेला प्रभाव आणखी कमी झाला व याचा फायदा मुंबईत ज्या विशेष स्थान नव्हते. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील साखर उद्योगावर ज्यांचे वर्चस्व होते त्या राजकारण्यांनी घेतला.

**शिवसेनेचा उदय व उत्कर्ष**

मुंबईतील घटनांचा कालानुक्रम पाहिल्यास असे स्पष्टपणे दिसून येते की शिवसेनेचा उदय व ट्रेड युनियन्स वरील डाव्या पक्षांच्या वर्चस्वाचा अस्त यांचा निश्चित संबंध आहे. औपचारिक क्षेत्रातला निर्गुंतवणूकीमुळे सुशिक्षित तरुणांच्या बेकारीमध्ये वाढ झाली. त्याचबरोबर यातील बहुसंख्य तरुण महाराष्ट्रीय होते, कारण इतर समाजांत स्वयंरोजगाराची परंपरा होती. याच पायावर शिवसेनेची उभारणी झाली.

तिचे प्रयत्न राजकीय दृष्ट्या सफल झाले, जेव्हा 1965च्या नगरापलिकेच्या निवडणुकीत मुंबई महानगरपालिकेचे नियंत्रण काँग्रेस पक्षाकडून तिने हिसकावून घेतले. या विजयाने शिवसेनेचा वाढता प्रभावच अधोरेखित केला नाही, तर इतर पक्षातील फूट व मतदारांची उदासीनता पण दाखवून दिली. मतदारांनी पुनश्च काँग्रेसच निश्चितपणे सत्तेवर येईल असे गृहीत धरले होते. या सर्व कारणांनी शहराच्या नागरीजीवनावर प्रभाव टाकणे शिवसेनेला शक्य झाले. याच काळात (1965-90) सेनेने आपला पाया मजबूत करून शहरावरील आपले वर्चस्व वाढवले. तिने भराभर आपल्या शाखांचा विस्तार केला व अनेक तरुणांना सभासद करून घेतले. मुंबईत जेव्हा दंगली उसळल्या तेव्हा शिवसेनेची सभासद संख्या 3,00,000 होती म्हणजे मुंबईच्या पोलीस फोर्सपेक्षाही अधिक होती.

या पाच वर्षांत शिवसेनेने आपले प्रभावक्षेत्र यशस्वीपणे मुंबईच नव्हे तर राज्यांच्या इतर भागातही विस्तारले.1989च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत तिने भारतीय जनता पार्टीबरोबर युती केली व जरी काँग्रेस पार्टी राज्यात सत्तेवर आली तरी सेना-भाजप युती हा सर्वात मोठा विरोधी पक्ष म्हणून राहिला.

मुंबईतील बदलते राजकारण व अर्थकारण याच आणखी एक अध:पात झाला होता. शहरी जीवनाचे गुन्हेगारीकरण. सोने, चांदी, इलेक्ट्रॉनिक सामुग्री या गोष्टी चोरून (जकात न भरता) आणणे हा परंपरागतच व जवळजवळ मान्यता पावलेला. काही जमातींचा व्यवसायच झाला होता. यातील हाजी मस्तान, युसुफ पटेल यासारखे काही महत्त्वाचे स्मगलर (चोरून माल आणणारे) यांची नावे सर्वातोमुखी होती. वृत्तपत्राला दिलेल्या एका मुलाखतीत 1993 मध्ये हाजी मस्तान असे म्हणाल्याचे सांगतात की ज्या देशाचा समुद्र किनारा भारताएवढा मोठा आहे तिथे ही चोरी सतत भरभराटणारच. (द टाइम्स ऑफ इंडिया, 11 एप्रिल, 1993 'द रिलक्टंट डॉन' - राजदीप सरदेसाई) तो पुढे म्हणाला की 1980 मध्ये या चोरट्या व्यवहारात अमली पदार्थांचा पण समावेश झाला. ''दुर्दैवाने तो म्हणाला' या अमली पदार्थांच्या व्यापारात नफा प्रचंड असतो. 10 पैशात तुम्ही 100 रुपये कमवू शकता''

याच काळात मुंबई व शिकागो यांची तुलना होऊ लागली. ही तुलना पोलीस व गुन्हेगारी टोळ्यांमधील गोळीबार, टोळ्यांचा परस्परातील गोळीबार याबाबतीत होऊ लागला व वृत्तपत्रांतून या चकमकीची वर्णने येऊ लागली. अमली पदार्थांबरोबरच शस्त्रास्त्रांचे स्मगलिंग होणे ही तार्किक परिणीती होती. 1980च्या दशकाच्या मध्यावर या टोळ्यांची ताकत उघडपणे मान्य करण्यात आली. राजकीय पक्षांना देखील पक्षातील पदासाठी माहिती असलेल्या गुन्हेगारांचे नाव सुचवण्यास काही वाटेनासे झाले. 1985 मधील म्युनिसिपल निवडणुकीत शिवसेना सत्तेवर आली, त्यावेळी शिवसेनेने खात्रीचा गुन्हागार किम बहादुर थाला उभे केले होते, जरी तो त्यावेळी तुरुंगात होता. तो तुरुंगात राहूनही निवडणूक जिंकला. त्यानंतर वर्षाला विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या दोघांना तिकीटे दिली. एक म्हणजे श्री. हितेंद्र ठाकूर

यांना वसई-विरारामधून व पप्पू कलानी यांना उल्हासनगरमधून. दोघेही निवडून आले. 1990 मधील म्युनिसिपल इलेक्शनमध्ये शिवसेनेचे महापालिकेतील वर्चस्व संपुष्टात आले, तेव्हा 40 हून अधिक गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना वेगवेगळ्या पक्षांनी उभे केले होते.

## राजकारण आणि गुन्हेगारी

गुन्हेगारी जगताचा गळफास तोडण्यासाठी पहिला एकत्रित प्रयत्न महाराष्ट्राचे नव्याने आलेले मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांनी केला. त्यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे श्री. शरद पवार यांच्याकडून घेतली होती. शरद पवार हे राज्यातील अत्यंत प्रभावी राजकारणी होते. पवार संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीस गेले होते. नाईकांनी प्रथम हितेंद्र ठाकूर यांचे बंधू भाई ठाकूर यांना अटक केली. नंतर काही महिन्यांनी त्यांनी त्याच्या राजकारणी भावाला तसेच कलानी यांना टाडा (टीएडीए) खाली अटक केली. (टेररिस्ट अँड डिस्क्रप्टिव्ह ॲक्टिव्हीटीज ॲक्ट) पवारांनी नेमलेला व कसलाही स्वतंत्र राजकीय पाया नसलेला माणूस - नाईक - अशा तऱ्हेची निर्णायक कारवाई करेल अशी अपेक्षा नव्हती, विशेषत: ज्यामुळे त्यांचे राजकीय वरिष्ट नाराज होतील.

त्यावेळेपर्यंत शिवसेना किंवा गुन्हेगार यांच्या राजकीय युतीविरुद्ध कोणत्याही मुख्य मंत्र्यांनी कारवाई केली नव्हती. नाईकांचे पूर्वसूरी शरद पवार यांची या विषयावरची भूमिका संमिश्र स्वरुपाची होती. त्यांच्या विरोधकांचा त्यांच्यावर असा आरोप होता की त्यांचे त्यांच्यापैकी काही ग्रुप्सशी जवळचे संबंध होते व त्यांची शहरांत शांततेचा आभास निर्माण करण्यासाठी शिवसेनेशी करार केला होता. अशा तऱ्हेचा करार खरोखरीच अस्तित्त्वात असेल तर तो नाईकांनी मोडला होता. या जखमेवर मीठ चोळण्यासाठी जणू नाईकांनी मंत्रिमंडळात फेरफार केला (नोव्हेंबर1992) व पवारांना पाठिंबा देणाऱ्या 11 मंत्र्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकले. त्यांच्या सन्मित्रांशी घेतलेला उघड पवित्रा पुढे ज्या घटना घडल्या त्याचे प्रकाशात महत्त्वपूर्ण होता. पक्षांत पडलेल्या फूटीचे हे पहिले पाऊल होते. व त्याचे पाप नाईकांच्या माथी येणे क्रमप्राप्त होते.

1992 च्या डिसेंबर मध्ये - मंत्रिमंडळाच्या फेरबदलानंतर जेमतेम एक महिन्यातच दंगली सुरू झाल्या. नाईकांनी सुरुवातीच्या महिन्यात गुन्हेगार-राजकारण्याशी सामना करताना जो कणखरपणा दाखवला तोच यावेळी दाखवला. पण या खेपेस मुंबईच्या नागरिकांच्या कौतुकाऐवजी सर्व बाजूंनी ते दोषाचे केंद्रबिंदू झाले. कारण या दंगलीत पोलीसांच्या गोळीबारात बहुसंख्य मुस्लीम मारले गेले. दंगलीचा दुसरा टप्पा सुरू होण्यापूर्वीच नाईकांवरील राजकीय दबाव वाढत गेला. पवारांमुळे या दबावाचा जोर वाढला. पवार दिल्लीतून मुंबईत येऊन बसले व त्यांनी शहरात तात्पुरता तळ ठोकला. यामुळे मुख्यमंत्र्यांच्या अधिकारास सरळ खीळ घातली गेली. कारण पवारांकडे एक समांतर शक्ती केंद्र म्हणून नाईकांचे विरोधक जाऊ शकत होते. नाईकांनी घेतलेल्या स्वतंत्र भूमिका पाहून पवार व त्यांचे समर्थक त्यांच्यावर नाराज होते. शहरातल्या खालावलेल्या स्थितीने त्यांना नाईकांची दुर्बलता व पवारांची ताकद लोकांपुढे मांडण्याची संधी दिली. शहरातील, शहराविषयी आस्था असलेल्या नागरिकांचे ग्रुप्स नाईकांच्या कणखरपणात एकाएकी कमतरता आलेली पाहून कोड्यात पडले व ते नेतृत्वासाठी पवारांकडे वळले. अशा तऱ्हेने जेव्हा नाईकांना पाठिंब्याची व दिलाशाची जरूरी होती. तेव्हा राज्यकर्त्या पक्षातील गटबाजीचे राजकारण जोरात चालले होते.

वारा कोणत्या दिशेने वाहत आहे त्याची नाईक यांना कल्पना आली असणे शक्य आहे. म्हणून त्यांनी हात वर करून पक्षांतल्या निश्चयी विरोधाला शरण जायचे ठरवले. त्यांना तळागाळातला भक्कम पाठिंबा नसल्यामुळे ते पवारांप्रमाणे लोकांच्या प्रभावाला सामोरे जाऊ शकले नाहीत. राज्य सरकारच्या दोन दंग्याबाबतच्या कारवाईतील जाणवणाऱ्या तफावतीचे थोडेसे स्पष्टीकरण यातून मिळू शकते. इथे हेही लक्षात घेणे जरुरीचे आहे की पवारांच्या मते बाबरी मशीद

तोडल्यामुळे या दंग्यांना सुरुवात झाली तर नाईकांच्या मते दंग्यांचा पहिला पट्टा गुन्हेगारी जगताने त्यांच्या सरकारला हेतुपुर:सर सुरुंग लावण्याच्या उद्देशाने अंमलात आणला होता. दंगा उद्भवण्याची काहीही कारणे असोत, तो जितका काळ चालला आणि हिंदू व मुस्लीम समाजात त्याने जो वैरभाव निर्माण केला तो उघड दिसत होता. या सर्वांचा संबंध जे राजकीय, आर्थिक व सामाजिक बदल हळूहळू होत गेले त्यांच्याशी होता व त्यानी हळूहळू मुंबईची ओळख, मुंबईचे व्यक्तिमत्व बदलून टाकले.

6 डिसेंबर, 1992 रोजी शेकडो हिंदू लढाऊ मंडळींनी तीन घुमट असलेल्या बाबरी मशीदीवर टिकाव, खोरी आदि हत्यारे घेऊन गर्दी केली व त्याचे परिवर्तन दगडांच्या ढिगाऱ्यात केले, तेव्हा ती बातमी क्षणात देशभर पसरली, इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्याद्वारे. दक्षिण मुंबईत जिथे तुम्हाला सेफ्टी पिनपासून ते रेफ्रिजरेटरपर्यंत कोणतीही वस्तू मिळू शकते त्या महमंद अली रोडवर ही बातमी धक्का घेऊन आली. त्याची प्रतिक्रिया जवळजवळ क्षणार्धात उमटली. शेकडो संतापलेले लोक विशेषकरून तरुण रस्त्यावर त्यांचा राग व्यक्त करायला धावले. पोलिसांना याची कल्पनाच नसल्यामुळे व त्यांनीच थोडी आपली प्रतिक्रिया व्यक्त करून जमावावर गोळीबार केला. नंतर त्याच रात्री शेजारच्याच भागात पोलीस कॉन्स्टेबल भोसकून मारला गेला.

## पहिला टप्पा

अशा तऱ्हेने रक्तपाताचा पहिला अध्याय सुरू झाला व तो सुमारे एक आठवडा चालला. हे झगडे काही विशिष्ट विभागातच चालू होते. त्यातला मुख्य म्हणजे पोलिसांनी निदर्शकांवर केलेला हल्ला व मुस्लीमांनी प्रतिक्रिया म्हणून पोलीस चौकींवर केलेले हल्ले. तथापि काही विभागात या हिंसेचे स्वरूप जातीय दंग्यांचे राहिले. उदा. 6 डिसेंबर, धारावी या प्रचंड झोपडपट्टीत शिवसेना व भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी बाबरी मशीद आदल्या दिवशी पाडल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी विजय शोभायात्रा काढली होती. या मिरवणुकीची प्रतिक्रिया व त्यामुळे समोरासमोर आलेले विरोधक यांच्यातील दंगल दोन दिवस चालली व त्यात 30 लोक मृत्यू पावले.

रात्रभराच्या दंग्यानंतर 7 डिसेंबरची सकाळ उजाडली. तेव्हा मुस्लीम व पोलीस यांच्यातील झगड्याचे वृत्त सगळीकडे पसरले. पुढच्या दिवशी सकाळी महमदअली रोड परिसरातील पोलीसचौक्या व काही मंदिरांवर हल्ले झाले. या विभागातील अरुंद व गर्दीच्या गल्ल्यांमध्ये पोलीसांनी जमावावर केलेल्या गोळीबारात अनेक लोक नक्की मृत्युमुखी पडले असणे शक्य आहे. अनेक निष्पाप लोक जे उघड्या खिडक्यांजवळ उभे होते, किवा सहज तिथून जात होते ते गोळीबारात मेल्याची उदाहरणे आहेत. काही तासांतच 43 लोक मारले गेले व 94 जखमी झाले. जसजसा अधिकाधिक जखमींचा ओघ हॉस्पिटलकडे येऊ लागला तसातसा जे जे हॉस्पिटलवरील दबाव वाढत गेला. जे. जे. हॉस्पिटल हे सर्वांत मोठे मुंबईतील सार्वजनिक हॉस्पिटल असून ते या विभागातच आहे. संध्याकाळपर्यंत लष्कराला पाचारण करावे लागले व मुंबईच्या मध्य व दक्षिण भागातील आठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत कर्फ्यू लागू करावा लागला.

त्याचवेळी मुंबईच्या उत्तरेकडील उपनगरांमध्ये गडबड सुरू झाली. एका ठिकाणी 1000 लोकांचा मुस्लीम जमाव एकत्र येऊन त्यांनी पोलीस स्टेशनवर हल्ला केला होता. दुसऱ्या एका ठिकाणी मंदिराची सुरक्षा करणाऱ्या दोन पोलीसांना ठार करण्यात आले. त्यानंतर प्रतिक्रियात्मक हल्ले प्रतिहल्ले चालूच राहिले व नंतरच्या तीन दिवसात 58 लोक मृत्यूमुखी पडले.

7 डिसेंबर या दिवशी मुस्लीम लीगने बंदची हाक दिली, बाबरी मशीद पाडल्याच्या निषेधार्थ, तर दुसऱ्या दिवशी म्हणजे 8 डिसेंबरला डावेपक्ष व काँग्रेस पक्षाने तशीच हाक दिली. पण यामुळे दंगे बंद झाले नाहीत. हे दंगे आता जोगेश्वरी व कुर्ला या उत्तरेकडील उपनगराकडे पसरले. त्या संध्याकाळपर्यंत मरणाऱ्यांची संख्या अधिकृतपणे 94 तर अनधिकृतपणे 130 किंवा त्याहून जास्त अशी होती व आणखी 5 विभागांना कर्फ्यू लागू केला होता.

दंगलीच्या पहिल्या टप्प्यात सर्वात वाईट दिवस म्हणून 9 डिसेंबर लक्षात राहील. त्यादिवशी शिवसेना व भाजपा यांनी अयोध्येतील घटनेनंतर त्यांच्या काही नेत्यांच्या अटकेच्या निषेधार्थ बंदचे आवाहन केले होते. हा त्यांच्या अनुयायांना उत्तमपणे वागण्याचा इशाराच होता. त्यांनी मुस्लीम आस्थापा व मशीदी यांवर हल्ले केले. एका ठिकाणी तर शिवसेनेने मुस्लीम घर दाखवून देणाऱ्यास 50 हजार रुपयाच बक्षीस मिळेल अशी नोटीस लावली होती.

त्यादिवशीची अत्यंत भयानक घटना उत्तरपूर्व उपनगर घाटकोपर येथील असल्फा गावात घडली. हिंदू लढाऊ मंडळीनी सरसकट जाळपोळ सुरू केली. टिंबर-यार्डस् स्क्रॅपयार्ड जिचे मालक बहुतेक मुस्लीम होते, त्यांना आग लावण्यात आली. त्यांच्या जवळपास असलेल्या सुमारे 300 झोपड्या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. लोक त्यांच्या चीजवस्तू गोळाकरून सैरावैरा पळू लागले. यावेळेपर्यंत मेलेल्यांचा अधिकृत आकडा 136 वर पोचला होता. यापैकी बहुसंख्य लोक मुस्लीम होते व त्यापैकी 90 टक्के पोलीसांच्या गोळीबारात बळी पडले होते.

10 डिसेंबर रोजी दंगलींना कंटाळलेले शहर कामावर परत जायचा प्रयत्न करू लागले. उपनगरी गाड्यांतून हजारो प्रवासी त्यांच्या कार्यालयात पोहचले. पण दुपार होताच हा व्यापारी विभाग पुन्हा रिकामा झाला, कारण लोक घरी घाईने परतू लागले. शहरात अशी दाट अफवा पसरली की शिवसेना प्रमुख बाळ ठाकरे यांना अटक झाली आहे. पोलीसांनी ही अफवा खोटी आहे हे सांगण्याचा प्रयत्न करूनही कोणीही आधीच्या तीन दिवसातील घटना पाहता हा धोका पत्करायला तयार नव्हते.

मुंबईच्या नागारिकांनी एकत्र सोडला, शुक्रवार दि. 11 डिसेंबर रोजी मुस्लीमांना नेहमीप्रमाणे त्याची प्रार्थना (नमाज) करायची होती. त्यासाठी 5 पेक्षा जास्त लोकांनी एकत्र यावेच लागणार परंतु ते कायद्याने प्रतिबंधित होते. पोलीसांनी शुक्रवारच्या नमाजास लागणाऱ्या वेळेपुरती कर्फ्यू उठवण्याचे ठरवले. धारावी सोडल्यास इतर सर्व ठिकाणी नमाज नीट पार पडला. धारावीमध्ये मुस्लीमांसाठी कर्फ्यूमध्ये सवलत देण्यावरून हिंदूंनी हरकत घेतली. किरकोळ चकमक घडून 1 मृत्यू व अनेकजण जखमी झाले.

परंतु 11 डिसेंबर दुसऱ्या एका कारणासाठी महत्त्वाचा आहे. कारण त्यादिवशी शिवसेनेने आपल्या लढ्याचा एक महत्त्वाचा घटक प्रस्तुत करण्यासाठी सबब शोधली. ज्यामुळे दुसऱ्या टप्प्यातील दंगलीसाठी ठिणगी तयार झाली. शनिवारी शिवसेनेच्या नेत्यांनी गोल देऊळात महाआरती करण्यासाठी कर्फ्यूमध्ये सवलतीची मागणी केली. हे देऊळ मुंबईच्या मध्य भागात असून शेजारी मुस्लीम बहुल विभाग आहेत. व त्याचे आतल्या बाजूस हिंदूबहुल वस्ती असून तो शिवसेना व भाजप यांचे प्रभावक्षेत्र आहे.

महाआरती ही हिंदूच्या रोजच्या धार्मिक कर्मकांडापैकी नाही व जेव्हा ती केली जाते तेव्हा ती मंदिरात केली जाते, बाहेर मंदिराबाहेर रस्त्यावर नव्हे. तरीसुद्धा शुक्रवारच्या नमाजाच्या वेळी मुस्लीमांना रस्त्यावर बसावे लागते, कारण त्यांच्या मशिदी सर्व लोकांना सामावून घेण्यास अपुऱ्या असतात, या मुद्याचे भांडवल करण्याचे शिवसेनेने ठरवले. नेतेमंडळींनी असे म्हटल्याचे समजते की यामुळे हे रस्ते हिंदूसाठी पुनः ताब्यात घेता येतील व मुस्लीम अल्पसंख्यांकाच्या अनुयायाच्या धोरणाचा शेवट होईल. ही महाआरती कसलाही कटुप्रसग न घडता पार पडली तरी त्यामुळे यापुढे घडणाऱ्या घटनांचा पाया रचला गेला.

13 डिसेंबर या दिवशी कर्फ्यु अखेर उठवला गेला व वाईट काळ आता संपला असे वाटले. नंतरच्या चार दिवसात तणाव हळूहळू कमी होत गेला व लोक आपल्या जीवनाचे धागे पुन्हा शोधू लागले. 16 डिसेंबरला दंगलीतील मृतांचा अखेरचा आकडा 227 सांगण्यात आला. वरवर पाहता मुंबईत शांतता प्रस्थापित झाली असे वाटले. 17 डिसेंबर ते 4 जानेवारी या काळात दंगलीच्या मोठ्या घटना घडल्या नाहीत. तरीसुद्धा शहर आतल्या आत उकळतच होते. भोसकाभोसकी व जाळपोळ यांच्या वेगवेगळ्या घटना होत होत्या. 2 जानेवारी

रोजी धारावीत पुन्हा गडबड झाली. पण डिसेंबरच्या तुलनेत या घटना एकदमच किरकोळ स्वरुपाच्या होत्या त्यामुळे कुणाचे तिकडे लक्ष वेधले नाही.

त्याचप्रमाणे सर्व महत्त्वाच्या मंदिरात महाआरती करण्याच्या शिवसेनेच्या योजनेची पण विशेष दखल घेण्यात आली नाही. 26 डिसेंबर व 6 जानेवारी रोजी ही योजना सुरू करण्यात आली, व जेव्हा दंगलीचा दुसरा टप्पा सुरू झाला तोवर 33 अशा महाआरत्या झाल्या होत्या. या महाआरत्यामुळे हिंदूमध्ये योजना निर्माण झाली केवळ शिवसैनिकातच नव्हे व त्यामुळे त्यांचा लढाऊपणा अधोरेखित झाला व हे मुस्लीम समाजाच्या लक्षात आले नाही, असे नाही.

**दुसरा टप्पा**

5 जानेवारीच्या पहाटे दक्षिण मुंबईतील मुस्लीम बहुल विभाग डोंगरी येथे दोन माथाडी कामगारांना भोसकून ठार करण्यात आले. हे कामगार डॉक्समध्ये जहाजावरील माल चढवण्या-उतरवण्याचे काम करत होते. हा हल्ला युनियन व इतर स्पर्धेमुळे होता की जातीय होता हे स्पष्ट झाले नाही. परंतु शहरातील तंग वातावरण पाहता तो जातीयच होता असे दिसते कारण मारले गेलेले लोक हिंदू होते व ते मुस्लीमबहुल वस्तीत मारले गेले होते. दुसऱ्या दिवशी जेव्हा भोसकाभोसकीची बातमी सगळीकडे पसरली व माथाडी कामगार मोठ्या संख्येने निषेध करण्यासाठी आले तेव्हा गोंधळ माजला. धारावीत, हिंदूंचे जमाव पहारी व तलवारी घेऊन मुस्लीम विभागावर हल्ले करू लागले. अनेक घरे, दुकाने, कारखाने यांना आगी लावण्यात आल्या व गोडाऊन्सची लूट करण्यात आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी हल्ले पुन: सुरू झाले, त्यांचा एक विशिष्ट साचा असावा याप्रमाणे. यानंतरचे लक्ष्य टॅक्सी ड्रायव्हर्स हे होते. कोणीही ड्रायव्हर मुस्लीम आहे असा संशय येताच त्याला टॅक्सीतून उतरवून टॅक्सीला आगी लावण्यात आल्या. बऱ्याचवेळा ड्रायव्हरला भोसकण्यात आले. याची प्रतिक्रिया म्हणून हिंदू टॅक्सी ड्रायव्हरवर मुस्लीम विभागात हल्ले झाले. परंतु यात मुस्लीमांवर बहुसंख्य हल्ले झाले.

6 जानेवारी रोजी या दुसऱ्या टप्प्यातील दंगलीने वेगळे वळण घेतले. उत्तरपश्चिम उपनगरातील जोगेश्वरी पूर्व भागातील गांधी चाळीतील हिंदू कुटुंबाचे एक घर पेटवण्यात आले. त्यात 30 वर्षे राहणाऱ्या एका जोडप्यासह पाचजण मेले. त्यात राजाराम व सुलोचना बर्वे, कमलाबाई बाटलू व त्याची 16 वर्षे वयाची मुलगी लक्ष्मी व मीनाक्षी नारकर, 20 वर्षांची अपंग वंदना कोंडळकर नंतर वारल्या. त्याची दोन मुले त्यांच्या जवळ होती ती वाचली.

या झोपडपट्टीतील बने कुटुंब हे सर्वात जुने रहिवासी होते. बने हे रंगाच्या कारखान्यात कामगार होते व शिवसेनेचे पाठीराखे होते. परंतु ते त्या पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते नव्हते. 1973 मध्ये जेव्हा पहिल्या जातीय दंगली झाल्या तेव्हा या मुस्लीमबहुल विभाग सोडून जाण्यासाठी त्यांना सल्ला दिला गेला होता. तो त्यांनी मानला नाही. त्यानंतर 1990-91 मध्ये पुन: एकदा जातीय दंगल भडकली ती आणखी गंभीर होता. तरीसुद्धा तो भाग सोडण्याची बने यांना जरुरी वाटली नाही. त्यावेळच दोन्ही समाजांचे संबंध इतके ताणले गेले होते की त्यांच्यामध्ये काहीच देवाणघेवाण होऊ शकत नाही.

8 जानेवारीच्या घटनेची चाहूल आधीच्या दोन रात्रीच लागली होती. 6 जानेवारीला शिवसेनेतर्फे जवळच्याच मंदिरात महाआरती झाली. ती झाल्यावर त्यात भाग घेण्याऱ्यांनी दंगेधोपे सुरू केले. मुस्लीम माणसाची बेकरी जाळली व अनेक मुस्लीम घरांना आग लावली. नंतरच्या रात्री 2.30 वा. महाआरतीहून परत येणाऱ्या जमावाने मुस्लीम घरांवर दगडफेक केली. अशा तऱ्हेने मुस्लीमांचा राग व असहाय्यता स्फोट होण्याइतक्या पातळीवर पोचली होती. बने कुटुंबावरील हल्ल्याची बातमी दुपारपर्यंत साऱ्या शहरभर पसरली, जरी सकाळच्या वृत्तपत्रांत ही घटना सकाळी लवकर घडल्यामुळे तिचा वृत्तांत आला नव्हता. शिवसेनेने त्याचे जागोजागी ठेवलेल्या फलकांवर - ज्यावर बातम्या व संदेश हातांनी लिहिले जातात - बातमी लिहून सगळीकडे पसरवली. हल्लेखोरांची ओळख पटण्यापूर्वीच शिवसेनेने

त्यांना मुस्लीम ठरवले व त्यांनी असहाय्य हिंदू कुटुंबावर हल्ला केला असे ठरवले.

यामुळे दंग्याच्या सर्वात वाईट पर्वाची सुरुवात झाली. दंग्यास 9 जानेवारीस सुरुवात झाली व 12 जानेवारीस संपला. त्यापूर्वी एक दिवस ठाकरे यांनी शिवसेनेचे मुखपत्र 'सामना' मध्ये लिहिले की हे हल्ले आता थांबतील कारण धर्मवेड्यांना धडा शिकवला गेला आहे. मुस्लीमांची घरे, कार्यालये, कारखाने व दुकानांना लक्ष्य करण्यात आले होते. मुस्लीम जिथे अल्पसंख्य होते त्या विभागत तरुणांचे जमाव गेले व त्यांच्यावर पद्धतशीर हल्ला केला. या दुकानांतून सर्व गोष्टी खेचून बाहेर काढत, हव्या त्या गोष्टी लुटून नेत व उरलेल्या सर्व गोष्टींना रस्त्यावर आग लावून देत. नंतर तो फ्लॅट किंवा दुकान पूर्ण लुटून नेले जाई, इतकेच नव्हे तरत इलेक्ट्रीकल फिटिंग्जसुद्धा खेचून काढत व त्या जागेस आग लावली जाई. या हल्ल्यांपैकी हृदय पिळवटून टाकणारा एक प्रसंग म्हणजे डोंगरी विभागातील - मुस्लीमबहुल वस्तीतील - दरगा चाळ. या चाळीत मुख्यत्वेकरून खालच्या मध्य वर्गातील मुस्लीम राहत. या चाळीतील खालच्या मध्य वर्गातील मुस्लीम रहात. या चाळीतील प्रत्येक खोली लुटण्यात आली व तिचा नाश करण्यात आला.

आधीच्या दोन दिवसातल्या घटनांनी तटस्थ राज्य सरकारला स्टेट रिझर्व्ह पोलिस व लष्कर यांना बोलावणे भाग पडले. 8 जानेवारी रोजी पोलीस कमिशनर एस. के. बापट यांच्यावर फायर बॉम्ब फेकण्यात आला होता पण त्यातून ते थोडक्यात वाचले. त्याच दिवशी शरद पवार जे तेव्हा संरक्षणमंत्री होते ते परिस्थिती पहाणी करण्यासाठी दिल्लीहून मुंबईत आले आधी नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या आगमनाने राज्य सरकारला सतावणाऱ्या पक्षघात अधिक तीव्र झाला. येथील मुख्यमंत्री श्री सुधाकरराव नाईक यांच्यावर केवळ नागरिकांचाच राग नव्हता तर पक्षसदस्यांचा देखील राग होता. त्यांना नाईकांचे नेतृत्व परिणामशून्य वाटत होते. तथापि जेव्हा ते दोघे बडे नेते त्याची राजकीय खेळी खेळत होते, तेव्हा शहर अक्षरशः जळत होते.

9 जानेवारी रोजी जाळपोळीच्या हजारो घटना घडल्या. दुसऱ्या दिवशी रे रोड येथील प्रचंड टिंबर मार्केटला आग लागली. जमाव शस्त्रे व फायरबॉम्बस घेऊन फिरत असताना पोलीसांनी काही न करता बघ्याची भूमिका घेतली. लष्कराने आपले अस्तित्त्व रस्त्यावर गस्त घालून दाखवले तरीही नागरी अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय प्रत्यक्ष कारवाई करू नये अशा त्यांना सूचना होत्या. परिणामस्वरुप शहर लुटारू टोळ्यांच्या हातात अक्षरशः सोपवून दिले गेले. 3,00,000 पोलीसदल व त्याच्या मदतीस असलेले लष्कर व लष्कर सदृश प्रशिक्षित दल असून हे थांबवण्यासाठी ते काहीही करू शकले नाहीत.

12 जानेवारीस मुस्लीम आस्थापना व घरे यांचेवरील पद्धतशीर हल्ले व नाश जरी थांबला तरी छोट्या प्रमाणावर हिंसा आणखी तीन चार दिवस चालू राहिली. यातील सर्वात वाईट घटना अँटॉप हिलवरील प्रतीक्षा नगरात घडली. प्रतीक्षा नगरात हाऊसिंग बोर्डाने बराकी पद्धतीच्या इमारती बांधल्या होत्या. शहरातील जुन्या भागातील ज्या इमारतींची दुरुस्ती चालू होती त्यांचेसाठी तात्पुरती राहण्याची व्यवस्था या प्रतीक्षा नगरात केलेली होती. पद्धतशीर गोंधळ घालत तरुणांच्या टोळ्या प्रत्यक मुस्लीम घरात शिरल्या व मुस्लीम कुटुंबाचे सर्वस्व त्यांनी लुटले व जाळून टाकले. मुस्लीमांची घरे आधीच पाहून व नक्की करून आपण हाऊसिंग बोर्डाचे नोकर असल्याचे भासवून हे काम त्यांनी केले होते. जेव्हा घरातील पुरुषवर्ग कामावर गेला तेव्हा दुपारी हे हल्ले सुरू झाले. मुले व स्त्रिया घाबरून घराबाहेर पळाल्या व स्थानिक पोलीस स्टेशनवर मदतीची याचना करत वाट पाहू लागल्या. दोन दिवस व दोन रात्री हे लोक एकत्र दाटीने जमा झाले तरी कोणीही त्यांच्या मदतीला पुढे आले नाही किंवा त्यांना अन्न व पाणी देऊ केले नाही. दोन दिवसानंतर लष्कराच्या रुपाने संरक्षणासाठी मदत अखेर येऊन पोचली. पण या धक्क्याने भयभीत झालेल्या स्त्रिया व कुटुंबाना तेथून हलवले जात असताना त्यांच्यावर हिंदूंनी फेकलेल्या सोडा वॉटरच्या बाटल्यांचा वर्षाव होत होता.

हा वर्षाव या अरुंद रस्त्यांना लागून असलेल्या उंच इमारतींमधून होत होता. अखेरीस त्यांची त्यांच्या पुरुषमंडळींशी पुनर्भेट मुसाफिर खान्यात झाली. मुसाफिर खाना, हे वसतीगृह दक्षिण मुंबईत मक्केच्या वार्षिक यात्रेसाठी जाणाऱ्या लोकांसाठी हज कामिटीने बांधलेले आहे.

हा अनेक मदत शिबिरांपैकी एक कँप होता. बेघर झालेल्या हजारो मुस्लीम कुंटुंबाच्या आसरा देण्यासाठी एका रात्रीत असे अनेक कँप्स तयार झाले. जेव्हा परिस्थिती रुळावर आल्यासारखी दिसते आहे, तोवरच सरकारने लोकांच्या न्यायालयीन चौकशीच्या वाढत्या मागणीचा विचार करून मुंबई हायकोर्टाचे जज श्री. बी. एन. श्रीकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली एक व्यक्ती चौकशी कमिशन नेमले, पण तेव्हाच बेहरामपाड्यात हिंसेचा स्फोट झाला. दरम्यानचे काळांत 26 जानेवारीचा प्रजासत्ताकदिन तणावाखाली साजरा झाला, जेव्हा झेंडावंदनाचे कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याची धमकी दिली गेली होती पण ती प्रत्यक्षात आली नाही.

बेहरामपाडा ही मुंबईच्या इतर अनेक झोपडपट्टीप्रमाणे वस्ती आहे. लोकांनी रेल्वे रुळानजीकची जागा हळूहळू व्यापत व्यापत ही वस्ती वाढली. झोपडपट्टीची जागा जरी रेल्वेच्या मालकीची आहे तरी ती काढून टाकण्याची कुठलीही कार्यवाही न झाल्यामुळे आता ती इतकी वाढली होती की आता तसे करण्यात बराच उशीर झाला होता.

आता ती अत्यंत दाट, गर्दीची झोपडपट्टी असून त्यांत मुस्लीमांचे प्राबल्य आहे. याठिकाणी लोक अत्यंत छोट्या, डगडगणाऱ्या तातपुरत्या निवाऱ्यात राहतात. ते निवारे बहुतेक लाकडाचेच बांधलेले आहेत. अत्यंत घाणेरडा सांडपाण्याचा पाट बेहरामपाडा व महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डाने बांधलेल्या मध्यमवर्गीयांच्या घरांच्या मधून जातो. या बिल्डिंग्जमध्ये राहणारी बहुसंख्य कुटुंबे हिंदू आहेत. वर्षानुवर्षे मध्यमवर्गीय हिंदू व बेहरामपाड्यातील झोपडपट्टीवासीय यांच्यामध्ये अस्वस्थ शांतता नांदत आहे. बेहरामपाड्यांतील अनेक स्त्रिया घरकामासाठी म्हणून समोरच्या मध्यमवर्गीयांकडे काम करतात. परंतु चांगल्या दिवसांतही दोघांमधील सुसंवाद अत्यंत कमी होता. 1 फेब्रुवारीस हाऊसिंग बोर्ड कॉलनीस लागून असलेल्या झोपड्यांच्या रांगेस आग लागली. या झोपड्यांतील लोक सांगतात की त्यांनी रस्त्यापलिकडच्या इमारतीवर लोक उभे होते व त्यांनी झोपड्यांवर फायर बॉम्ब्स टाकले. उलट त्या बिल्डिंगमधील लोकांनी त्यांच्या खिडकीवरची बंदुकीच्या गोळ्यांची भोके दाखवली. त्यांचा दावा असा की बेहरामपाड्यांतून गोळ्या मारल्यानंतर दंगल सुरू झाली. या घटनांनी दोन्ही समाजात दुराध्य दुभाजक रेषा आखली गेली यात शंका नाही.

बेहरामपाड्यातील स्फोटाबरोबरच दंग्याचा दुसरा टप्पाही संपुष्टात आला. त्यानंतर किरकोळ घटना घडत राहिल्या, पण दुसऱ्या टप्प्यासाठी द्यावी लागलेली किंमत पहिल्या टप्प्यापेक्षा मोठी होती. डिसेंबरमध्ये 227 मृत्यू झाले व जानेवारीत तो आकडा त्याच्या दुपटीहून अधिक म्हणजे 537 चा होता. वृत्तपत्रांच्या अंदाजानुसार दंगलग्रस्तांपैकी60-67 टक्के लोक मुस्लीम होते, ज्यांचे मुंबईच्या लोकवस्तीशी प्रमाण 13 टक्के आहे.

**दंग्याचा परिणाम**

दंगलीच्या दुसऱ्या टप्प्यात मोठ्या प्रमाणावर लोकांचे स्थलांतर झाले. अनेक हिंदू व मुस्लीमांनी आपल्या जागा सोडून शाळा, कॉलेजेस, मंदिरे, मशिदी व रेल्वे स्टेशनवर सुद्धा तात्पुरता आश्रय घेतला. त्याचप्रमाणे शहरातील स्थलांतरीत लोकांनी मोठ्या प्रमाणावर मुंबईतून बाहेर जाण्याचे ठरवले. अंदाजे 1,50,000 लोक जानेवारी 10 ते 15 च्या दरम्यान मुंबई सोडून बाहेरगावी गेले. यातील बहुसंख्य उत्तर हिंदुस्थानातील पुरुष होते, ज्यांनी आपली बायका-मुले परत त्यांच्या खेडेगावात नेली. ते त्यांना जास्त सुरक्षित वाटले.

पहिल्या टप्प्यातील दंगल जी नेहमीची दंगलक्षम ठिकाणे आहेत. उदा. मध्य व दक्षिण मुंबई यांच्या पुरतीच मर्यादित होती. या ठिकाणी एक तर संमिश्र वस्ती होती व दोन्ही जमातीची सारखी संख्या होती. किंवा मुस्लीम बहुसंख्य वस्ती किंवा काही मोठ्या झोपडपट्ट्या जिथे अशा तऱ्हेच्या जातीय दंगली

पूर्वी झालेल्या आहेत. शहराचा बराचसा भाग या दंगलीपासून अस्पर्शित राहिला, विशेषत: पश्चिमेकडील अधिक श्रीमंत भाग. लोकांचे जमाव येत व या इमारतीत कोणी मुस्लीम राहतात काय याची चौकशी करत व त्यांचे फ्लॅट्स कोणते याची माहिती देण्यास सांगत. बिल्डिंगमधल्या घाबरलेल्या रहिवाशांनी स्वत:च्या नावाचे बोर्ड काढून टाकले, इमारतीसाठी स्वतंत्र सुरक्षा व्यवस्था केली व गेट्सना कुलूप लावले तथापि दुसऱ्या टप्प्यामध्ये सर्व दर्जाच्या लोकांना त्रास झाला व त्यामुळे नेहमी धावपळ करणारी व्यापारी मुंबई एकदम थंड झाली. शहराच्या उच्चभ्रूमध्ये एक चैतन्य आले जे लोक एरव्ही मुळीसुद्धा हलले नसते त्यांनी एकत्र येऊन नागरिक मंडळ स्थापन केले. त्यांनी केवळ मदत कार्याच केली नाही तर हॉट लाईन्स प्रस्थापित केल्या, ज्यांच्यामुळे अडचणीत असलेले लोक पोलीस किंवा लष्कराला फोन करून त्यांची मदत मिळवू शकतील.

## शिवसेनेची भूमिका

दंगलीच्या दुसऱ्या टप्प्यांचे अनेक पैलू आहेत. ज्यांची दखल घेणे आवश्यक आहे. बाबरी मशीद पाडल्याबद्दलची मुस्लीम समाजाची प्रतिक्रिया व राज्याचा पडसाद म्हणून दंगलीच्या पहिल्या टप्प्याकडे जर पाहिले तर दुसरा टप्पा हे जास्त विचापूर्वक व सुनियोजित प्रकरण वाटते. या नियोजनाच्या केंद्रस्थानी नि:संशयपणे शिवसेना होती. पक्षाचे मुखपत्र सामना त्यांच्या रोजच्या पत्रांत जे लिहित होता त्यामुळेच केवळ हे प्रस्थापित होत नाही तर वृत्तपत्रातील बातम्या व अशासकीय चौकशीतून मिळालेला पुरावा हेच सांगतो. दंगलीचा दुसरा टप्पा जरा वेगळ्या तऱ्हेने समोर येतो. कारण ज्या सुनियोजित प्रकारे मुस्लीमांची घरे व आस्थापनांवर हल्ले झाले आणि हिंदूमध्यम वर्ग जो आजवर शिवसेनेच्या आडदांड डावपेचापासून दूर राहिला होता त्या वर्गाचा पाठिबा शिवसेने कशी मिळवू शकली? यावरून हे वेगळेपण दिसून येते. एका धोरणामुळे सेनेचा फायदा झाला तेम्हणजे महाआरतीचे धोरण. मध्यमवर्गीय हिंदूंचा पाठिंबा मिळवण्याचे महाआरती हे अतिशय हुशारीचे धोरण होते. अन्यथा या लोकांनी अल्पसंख्याकांविषयी कोणत्याही कृतीने असे कावीळ झाल्यासारखे प्रकटीकरण केले नसते. धर्माचा वापर करन अशा लोकांना रस्त्यावर करून आणण्याचे त्यांच्यातील धार्मिक एकतेची भावना उफाळून आली, हिंदूमधल्या लढाऊ मंडळींना या प्रसंगामुळे असा उत्साह संचारला की त्यांचे जमाव आरती असेल तेथे जात व शेजारपाजारच्या मुस्लीम समाजावर हल्ले चढवत. जानेवारीत झालेल्या अशा हल्ल्यांपैकी अनेक हल्ले महाआरतीवर झाले आहेत.

महाआरतीवर बंदी घालावी अशी मागणी होत असतांना आधीच अडचणीत असलेले सरकार अशी कृती करू शकत नव्हते. लक्षावधी मुस्लीमांचे जीवन धोक्यात असले तरी बहुसंख्य हिंदूंना दुखावणे शक्य नव्हते. भाजपा व शिवसेना दोघांनाही हे ठाऊक होते की राज्य व केंद्रात सत्तेवर असलेले काँगेस सरकार हा मुद्दा त्यांच्या हातात आपणाहून देणे शक्य नव्हते. कारण पुढील निवडणुकीत त्याचा विरोधकांना फायदा होऊ शकला असावा. अशा तऱ्हेने राज्य सरकार त्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहात होते व शिवसेना भाजपा बदी हुकूम मोडून डझनवारी महाआरत्या आयोजित करत होते.

त्याचवेळी शिवसेना मुस्लीमांच्या प्रतिहल्ल्याची अफवा पसरवून बहुसंख्य हिंदूच्या मानातल्या छुप्या भीतीचा परिणामकारकपणे फायदा घेत होती.

जहाजे भरून शस्त्रास्त्रे आपल्या किनाऱ्यांवर येत आहेत. ट्रक भरून हल्लेखोर हिंदूबहुसंख्य इमारतींवर हल्ला करण्याच्या तयारीत आहेत अशा तऱ्हेच्या अफवा पसरत होत्या. त्यांचा परिणाम म्हणून अशा विभागांत तरुण मुलांनी गस्ती पथके तयार केली व ते रात्र रात्र जागत गस्त घालू लागले. त्या हल्ल्यांची वाट पहात की जे कधीच आले नाहीत.

मध्यम वर्गीय हिंदूंचा असंयुक्तिक प्रतिसाद पाहता असे दिसून येते की जातीयवादाचे विष सरकार मध्ये कोठवर भिनले आहे. खोलवर जाऊन बसलेले पूर्वग्रह व मुस्लीमांबद्दल संशय या गोष्टी आता उघडपणे चर्चिल्या जात होत्या व त्याचा उपयोग या मूर्खपणाच्या वागण्याचे समर्थनार्थ केला जात होता. मुस्लीम

हे अल्पसंख्य आहेत व त्यांच्यापैकी बहुसख्य लोक त्यांची जास्त वस्ती असलेल्या भागात राहतात व इतरत्र राहणारे छोटे ग्रुप्स हिंदू बहुसंख्य असलेल्या वस्त्यांवर हल्ले करू शकणार नाहीत. या सत्य गोष्टीसुद्धा त्यांचे पूर्वग्रह व समजुती नष्ट करू शकल्या नाहीत.

या जातीय निखाऱ्यांना वारा घालण्याचे व ते फुलवण्याचे काम शिवसेनेने चालवलेल्या सामना या मराठी वृत्तपत्राने व दोपहरका सामना या हिंदी वृत्तपत्राने केले. दोन्ही वृत्तपत्रांनी मुस्लीमांच्या विरोधी आगीत तेल ओतले. कित्येक हिंदूचा मृत्यू हा मोठ्या शीर्षकाखाली छापला जाई. मुस्लीम व राष्ट्रविरोधी हे समानार्थी शब्द म्हणून वापरले गेले. डिसेंबर 1993च्या सुरुवातीची संपादकीये उदाहरणार्थ असे लिहितात, ''सर्व मशिदी या अवैध शस्त्रास्त्रांची कोठारे आहेत'' (8 डिसेंबर) किंवा ''राष्ट्रद्रोह व विष यांचे देशातील मोहल्यामधून पाट वहात आहेत.... धर्मवेड्या मुस्लीमांचे वसतीस्थान... पाकिस्थानशी एकनिष्ठ.... 25 कोटी पाकिस्तानशी एकनिष्ठ असलेले मुसलमान म्हणजे पाकिस्थानाकडे असलेल्या सात अणुबॉम्ब पैकीच एक आहे. (9 डिसेंबर) 9 जानेवारीला दुसऱ्या टप्प्यातील दंगल जोरात असतांना हे वृत्तपत्र चिथावणी देत पुढे म्हणते, ''भेंडीबाजार, नळबाजार, डोंगरी व पायधुनी येथील मुस्लीम विभागाला आम्ही मिनी पाकिस्तान म्हणतो. येथील मुसलमानांचा हिंदूस्थानला उखडून टाकण्याचा निश्चय झाल्यामुळे त्यांनी त्यांची शस्त्र बाहेर काढली आहेत. त्यांना जागेवर गोळ्या घातल्या पाहिजेत. लवकर येणाऱ्या मुस्लीमांच्या हल्ल्याच्या अफवा वरचेवर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत होत्या जणू काही त्या सत्य होत्या. महाराष्ट्रीय मध्यमवर्ग (पोलीस दलाचे सभासद धरून) जे या वृत्तपत्राचे वाचक होते. (अंदाजे 100,000) त्यांच्यावर या रोजच्या भडिमाराचा परिणाम होणे क्रमप्राप्त होते.

### पोलीसांची धमकी

दंगलीच्या दुसऱ्या भागात शहराचे पोलीसदल, ज्याचा एकेकाळी देशातले उत्कृष्ठ पोलीसदल म्हणून लौकीक होता, ते किती जातीयवादी झाले आहे हे उघड केले. मुंबई हायकोर्टाचे दोन निवृत्त न्यायाधीश जस्टिस एच.एम.दाऊद व जस्टिस एस. सुरेश यांनी इंडियन पीपल्स ह्यूमन राईट्स कमिशनच्या वतीने दंगलीची चौकशी केली, त्यांच्या मते पोलीस दलातल्या बहुसंख्य पोलीसांचे बहुसंख्य समाजाशी सख्य आहे, ते अल्पसंख्य समाजाशी नाही. आमच्याकडे असा पुरावा आहे की एका पोलीस स्टेशनमध्ये पोलीसांनी आरोपीला 'जय श्रीराम' म्हणण्याची सक्ती केली, जर का त्यांच्याबद्दल काही विचार करावा असे वाटत असेल तर. ग्लासभर पाणी मागावे व ते द्यावे इतकी साधी ती गोष्ट त्यांना वाटत होती. पोलीसांचे जे रेडिओ मेसेजेस टॅप केले त्यावरून पोलीस मुसलमानांबद्दल किती घाणेरडी भाषा वापरत होते व त्यांना दिली जाणारी मदत हेतुपुरःस्सर थांबवली जाईल किंवा त्यांच्यापर्यंत पोचण्यात विलंब होईल असे पहात.

या चौकशीचा अहवाल 'लोकांचा निवाडा' या नावाने असे सांगतो की दंगलग्रस्तांनी सही करून दिलेल्या शपथेवरच्या जबानी प्रमाणे 22 पोलीस स्टेशन मधील 80 पोलीस हे जातीय कल असलेले आहेत. या अहवालावरून असे दिसते जे हिंदू तरुण दंगल करत होते त्याच्याशी पोलीसांचे संगमनत होते. प्रत्यक्ष दंगल पाहणाऱ्यांच्या वर्णनाप्रमाणे लुटालूट चालू असताना बाजूला उभे राहून ती चालू देणारे पोलीस काही वेळा त्यांच्यातच सामील होत. असेही म्हटले जाते की पोलीस हिंदू लढाऊ मंडळींना उघड सहानुभूती दाखवत याचे कारण ती दंगलीच्या पहिल्या टप्प्यातील घटनांची प्रतिक्रिया होय, असे त्यांना वाटले. कारण त्यावेळी मुस्लीम तरुणांचे ते लक्ष्य होते.

### ताजा कलम

दंगलीचे दोन टप्प्यांचा विचार शुक्रवार दि. 12 मार्च, 1993च्या ओळीने झालेल्या बॉम्ब स्फोटापासून वेगळा काढून करता येणार नाही. दोन तासांच्या अवधीत दहा जोरदार बॉम्बस्फोट होऊन शहराचे वेगवेगळे विभाग हादरले. यासाठीचे प्रभावी स्फोट आर.डी.एक्स हे वेगवेगळ्या वाहनातून नेऊन ती वाहने शहराच्या वेगवेगळ्या डावपेचाच्या दृष्टीने महत्त्वाच्या

ठिकाणी पार्क केली गेली. व त्यातील आरडीएक्स अत्यंत हुशारीने जेव्हा कमालीची गर्दी असेल त्यावेळेस स्फोट व्हावा अशा तऱ्हेने ठेवली गेली. या स्फोटाचे लक्ष्य मुंबई स्टॉक एक्सचेंज जे मुंबईत अगदी गर्दीच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे व नरिमन पॉईंट येथील एअर इंडिया बिल्डिंग जिला शहराचे मिनी-मॅनहटन असे म्हटले जाते.

याचा परिणाम म्हणून 317 माणसे ठार झाली व असे क्षणभर वाटले की शहर पुन: एकदा गोंधळाच्या तडाख्यांत सापडणार. पण यावेळी असा फरक होता की महाराष्ट्राचा खंबीर नेता शरद पवार यांनी राज्याची सूत्रे हातात घेतली होती मुख्यमंत्री म्हणून. ही वेळ त्यांच्या पहिल्या खऱ्या परीक्षेची होती. त्यांच्या पूर्वसुरीपेक्षा चांगल्यातऱ्हेने शहराची व्यवस्था पाहण्याची. 24 तासांच्या आंत पवारांनी शहर पूर्वपदावर आणले.

बॉम्ब स्फोटामुळे होणारे सततचे प्रतिध्वनी थांबायला थोडा वेळ लागला. त्याच्यामुळे लोकांमध्ये संताप निर्माण झाला व हिंदू व मुस्लीम यांच्यामधली दरी रुंदावली. या स्फोटातील संशयित आरोपी बहुतेक मुस्लीम होते व त्यांना लगेच अटक होऊन त्यांच्यावर खटले भरण्यात आले. दंग्यांना चिथावणी देताना ज्यांना पाहिले होते ते शिवसेनेचे नेते मोकळे राहिले. बॉम्बस्फोट हे साठून राहिलेल्या भावनांचा निचरा असे समजले तरी शहरातील रक्तपात पाहता त्यांनी काहीच साध्य झाले नाही. हिंदू व मुस्लीम आणि मुस्लीम व पोलीस यांच्यामधील विभाजन हे अधिक दृढ झाले. अविश्वास संपला नाही. सोन्याच्या शहरात हे समाज आपापल व्यापार व्यवसाय करू लागले पण पूर्वपिक्षा खूपच सावधपणे.

डिसेंबर 1992 व मार्च 1993 मधील घटना यांनी मागे सोडलेले शहर हे कायमस्वरुपी बदलले, त्याचा कमजोर पणा उघड झाला. या आधी इतिहासातील भागीदारी, शहराच्या अर्थव्यवस्थेचे स्वरुप ज्यामुळे अनेकांचा फायदा झाला, ज्यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शहराला स्थैर्य प्राप्त झाले. दंगलीने हे दाखवून दिले की शहराच्या अर्थव्यवस्थेतील व राजकीय जीवनात जे व्यक्त व अव्यक्त बदल घडून होते त्यांनी जी पडझड त्या आठवड्यात झाली त्याला कसा हातभार लावला होता. वरवर सीरीयल बॉम्ब स्फोटानंतर जीवन नेहमीप्रमाणे सुरळीत सुरू झाल्यासारखे वाटले. तरीसुद्धा असे अधिक खात्रीलायकरित्या वाटू लागले की मुंबई हे आता खरोखर दुभंगलेले शहर झाले आहे, केवळ हिंदू व मुस्लीमांतच नव्हे तर ज्यांच्या बदललेल्या आर्थिक वातावरणात फायदा होत आहे व जे त्याच्यातून बाहेर आहेत त्यांच्यात. ज्यांचा फायदा होत नाही ते फायदा होणाऱ्यांपेक्षा संख्येने जास्त आहेत, व त्यामुळे भविष्यातील अधिक झगड्याचा आराखडा हे शहर बनू शकेल.

**अनुवादक : एस. एन. निबंधे**

▪ ▪ ▪ ▪ ▪